पेण एज्युकेशन सोसायटीचे,
भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पेण – रायगड

**मागासवर्गीय विद्यार्थी कक्ष**

भाऊसाहेब नेने महाविद्यालयात मागील १५ वर्षापासून मागासवर्गीय कक्ष कार्यरत आहे. या कक्षामार्फत एस.सी.एस.टी.एन.टी.,एस.बी.सी.,ओ.बी.सी. विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांसंदभात मार्गदर्शन केले जाते. या विद्यार्थ्यांची वर्षातून दोन वेळा एकत्रित सभा आयोजित केली जाते. यामध्ये विद्यार्थ्यांच्या विविध समस्या सोडविण्यात येतात. महाविद्यालयातील ग्रंथालयामार्फत या विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाची पुस्तके वर्षभर अभ्यासासाठी मोफत पुरविली जातात. या विद्यार्थ्यांवर शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसंदर्भात कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही याची काळजी मागासवर्गीय कक्षाकडून घेतली जाते. या कक्षाच्या कामकाजासाठी महाविद्यालयामार्फत एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीचे प्रमुख प्राचार्य डॉ.एस.बी.धारप हे असून समितीचे इतर सदस्य प्रा.व्ही.डी.भाबड, प्रा.डी.के. बामणे, प्रा.डॉ.ए.डा.कांबळे हे आहेत.